# ग्रामपंचायत कदमवाकवस्ती
# ता. हवेली जि. पुणे ४१२२०१

---

ई निविदांतर्गत एका वर्षाकरिता साहित्य खरेदी निविदा सूचना

सन २०२६ – २०२७ सूचना क्र ५

ग्रामपंचायत कदमवाकवस्ती ता.हवेली जि. पुणे यांचे तर्फे योग्य त्या वर्गामधील पुरवठादाराकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या ई निविदा मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फी रक्कम रु. | इसारा रक्कम | आवश्यक कंत्राटदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|
| १ | **मौजे कदमवाकवस्ती येथे BOQ विविध ठिकाणी दिलेल्या स्पेसिफकेशननुसार ग्रामपंचायत कार्यालय करीता इलेक्ट्रॉनिक कार्यालय साहित्य यादी पुरविण्याकरिता दर मागविणे.** | ५००/- | ५०००/- | अधिकृत पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र / उत्पादकता |

निविदाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) सदर संपुर्ण ई निविदा ऑनलाईन पदधतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना, शुद्धीपत्रके इत्यादींची माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) वरील कामाची निविदा पत्रके https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर निविदा पत्रके, अटी शर्ती इ. सदर संकेतस्थळावरून दि. **१५/०५/२०२६ रोजी :००** वाजल्यापासून ते दि. **२२/०५/२०२६ रोजी १२:००** वाजेपर्यंत अधिग्रहित (DOWNLOAD) करता येईल व ऑनलाईन पदधतीने सादर करता येईल.

३)सदर कामाच्या निविदाबाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

1. प्रत्येक कामाचे निविदापत्रक डाऊनलोड (DOWNLOAD) केल्याची फी Payment Gateway or Online Banking करावा.
2. इसारा रक्कम Payment Gateway or Online Banking upload करावी.

**1. पुरवठादार नोंदणी प्रमाणपत्र/ना-हरकत दाखला MSME प्रमाणपत्र व प्राप्तीकर पॅनकार्ड (PAN) स्कॅन करुन अपलोड (upload) करावी लागेल.**

**2. सदर चा पुरवठा ग्रामपंचायतिने दिलेल्या संबधित ठिकाणी पुरवठा आदेश मिळाल्यानंतर ग्रामपंचायतच्या निर्देशनुसार पुरवठा करावा लागेल.**

**3. सदर साहित्याची असलेली मागणी विहित मुदतीत करावयचा असून त्यासाठी कोणतेही वेगळे चार्ज अथवा वाढीव मुदत दिली जाणार नाही.**

**4. साहित्य पुरवठा करताना आवश्यकती सर्व बिले व वॉरंटी प्रमाणपत्र संबधित पुरवठा करावयचा ठिकाणी संबधित ग्रामपंचायत कदमवाकवस्ती यांकडे सुपूर्त करावयाची आहे.**

**5. वॉरंटी कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कमेची मागणी केल्यावर परत केली जाईल.**

**6. जाहिरातील बयाना आणि इसारा रक्कम ची पूर्तता करणे बंधनकारक आहे.**

**7. पुरवठा आदेश मिळाल्यानंतर पुरवठ्यातील अटी शर्ती मान्य असल्याबाबत तसेच मुदतीत पुरवठा करून देण्याबाबतचे हमी पत्र रक्कम रु.५०० चा स्टंम्प पेपरवर करून द्यावे लागणार आहे.**

# ग्रामपंचायत कदमवाकवस्ती
# ता. हवेली जि. पुणे ४१२२०१

---

**8. विहित मुदतीत पुरवठा न केल्यास नियमानुसार प्रती आठवडा अर्धा टक्के दंड आकारला जाईल व तो आपले देयकाकडून वसूल केला जाईल.**

**9. सध्यस्थित यासाठी ग्रामनिधी उपलब्ध नसल्यास रक्कम उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येईल.**

**10. विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (on Bidder Letter Head) स्कॅन करून अपलोड (upload) करावी लागेल.**

**11. GST आणि ३ वर्षाचे ITR कागदपत्र अपलोड करणे बंधनकारक राहील.**

**12. STOCK-STATEMENT अपलोड करणे आवश्यक आहे.**

**13. पुरवठादराने साहित्याचा पुरवठा करण्याआधी सदर प्रत्येकी एकतरी साहित्य बाबतचा नमुना ग्रामपंचायत कदमवाकवस्ती ता.हवेली जि.पुणे येथे पोच करून कृपया त्याची नोंद ग्रामपंचायत कदमवाकवस्ती मध्ये करण्यात यावी.**

**14. सदर साहित्याचा या आधी शासकीय किंवा निमशासकीय सेवेमध्ये पूर्णपणे पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा दाखला अपलोड करणे आवश्यक आहे.**

**15. सदरच्या साहित्यावर रेडियम ने ग्रामपंचायत कदमवाकवस्ती ता.हवेली जि.पुणे असे टाकून सदर साहित्य पुरवठा करणे आवश्यक आहे.**

**16. निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहतील.**

**17. उपरोक्त कागदपत्रे करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलती दिली जाणार नाही.**

**18.** ऑनलाईन पदधतीने सादर केलेल्या निविदा शक्यतो **दि. २३/०५/२०२६ रोजी १२:००** वाजता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ग्रामपंचायत कार्यालय कदमवाकवस्ती ता. हवेली जि. पुणे येथे उघडण्यात येईल.

**19.** मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम हि कामाचा करारनामा करतेवेळी ग्रामपंचायत कदमवाकवस्ती ता. हवेली जि. पुणे येथे देणे असलेल्या धनाकर्षाचे स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम देयकाकतून कपात केली जाईल.

**20.** निविदा बाबतीत कोणत्याही मार्गदर्शन सूचना, शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

Signature Not Verified

Digitally signed by Nasirkhan Manulakhan Pathan
Date: 2026.05.15 12:10:03 IST
Location: Maharashtra-MH